जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०२/२०२४
## दि.१३/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ७५/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३४ वर्षे,रा.५६७,गणेश पेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०२४ रोजी रात्री ११/१५ वा.ब्लु रॅडीसन हॉटेलचे समोरील बाजुस,रायझिंग हॉस्पीटलकडे जाणा-या डांबरी रोडचे बाजुला,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र याचेशी गप्पा मारत उभे असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना पाठीमागुन मिठी मारून त्यांचे गळयातील सोन्याची चेन ५०,०००/- रू किमतीची जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेगर ९५५२५२९६८६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ८९/२०२४,भादविक ३२४,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | नितीन देशमुख (कडु),वय-४५ वर्षे,रा.हिंगणे-खुर्द,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ११/०२/२०२४ रोजी रात्री १०/०० ते १०/३० वा.चे दरम्यान मातृछाया अपार्टमेंट,फ्लॅट नं.३०२,चौथा मजला,पुणे येथील टेरेसवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते बिल्डींगचे टेरेसवर असताना,त्यांचा भाऊ व बहिण असे त्यांचे मधील सदर बिल्डींगचे विकसीकरणाच्या जुन्या आर्थिक व्यवहाराच्या देवाण-घेवाणीवरुन नमुद इसम व त्याचे साथीदारांनी आपसात संगनमत करून,नमुद बिल्डींगचे टेरेसवर येवुन फिर्यादीस तु माझ्या दाजीला,मोहितेला आणि शरद भाऊंना पैसे मागतोय,लय मस्ती आलीय तुला,तुला आज बघुन घेतो अशी धमकी देवुन,त्यांना शिवीगाळ करुन लाथा-बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याचे हातातील कोणत्यातरी धारदार हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात मागील बाजुस मारुन त्यांना जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मालुसरे ८६६८२८०११७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३४/२०२४,भादविक ३२६,५०६,५०४,३४,,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | दिपक रणदिवे,वय-१८,रा.सर्वे न.४११/३७,अप्पर बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०२४ रोजी रात्रौ ०२/०० वा.संविधान चौक,अप्पर बिबवेवाडी,पुणे याठिकाणी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे ओळखीचे असुन,फिर्यादी हे त्यांचा मित्र प्रथमेश जानराव याचेसह जात असताना,यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन येवुन,फिर्यादी व प्रथमेश जानराव यांना थांबवुन,जुन्या भांडणाचे कारणावरून तुम्हाला जास्त मस्ती आली का असे म्हणुन फिर्यादीस लाथा-बुक्यांनी मारहाण करून,त्यांचेकडील हातातील लोखंडी हत्याराने फिर्यादी यांचे उजव्या हातावर,पायाचे मांडीवर,नडगीवर,घोटयावर,पंज्यावर,पाठीवर व डोक्यावर मारुन जबर जखमी केले. तसेच प्रथमेश जानराव यास शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन,सदरबाबत कोणाला सांगीतले तर जीवे मारु अशी धमकी दिली. त्यावेळी सदर परिसरातील काही नागरीक आवाज ऐकुन मदतीकरिता येत असताना,सदर इसमांनी त्यांचे हातातील हत्यारे हवेत फिरवुन शिवीगाळ करून,कोणी मध्ये आला तर खल्लास करून टाकीन अशी धमकी देवुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिल्पा लंबे ९५५२७९९१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**